# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – १३ ऑगस्ट २०१५

मुंबई – साहित्याचे समाजीकरण आणि विस्तारीकण होणे ही काळाची गरज असून,समकालीन साहित्य आणि समाज या दोन्ही परस्पर पुरक बाबी असल्याचे प्रतिपादन ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ साहित्यीक डॉ.भालचंद्र नेमाडे यांनी आज केले.ते मुंबई विद्यापीठातील राजीव गांधी समकालीन अध्यासन केंद्राच्या वतीने आयोजित केलेल्या ४ थे राजीव गांधी व्याख्यान या कार्यक्रमात बोलत होते.समकालिन साहित्य आणि समाज या विषयावर ते बोलत होते.पुढे बोलतांना ते म्हणाले की, देशात १ हजार ६५७ भाषा बोलल्या जातात, तर आपल्या राज्यातच २५ भाषा आहेत, मात्र यापैकी एकाही भाषेची जननी ही संस्कृत भाषा नाही. उलट भारतीय भाषांमधून संस्कृत भाषेचा जन्म झाला असल्याचे त्यांनी सांगितले.
नेमाडे यांनी भारतीय भाषेच्या साहित्याच्या संदर्भात अनेक दाखले दिलेत. तसेच मराठी भाषेच्या साहित्याचा उगम हा इसवी सनाच्या दुस-या शतकात झाला त्या काळात जैन मराठी व्याकरणकरांनी मराठी भाषा पुढे आणली. अनेक जैन मराठी व्याकरणकार, तत्वज्ञ होऊन गेले, त्यांनी मराठी भाषेला विकसित करण्याचे काम केले.
आपल्या देशात भाषा आणि बहुसांस्कृतिकता ही केवळ भाषांच्या वैविधतेमुळेच टिकून आहे. जगभरातील अमेरिकेसारख्या देशात त्यांच्या मूळ असलेल्या ६०० भाषा या कधीच संपल्या आहेत, मात्र आपल्याकडे परिस्थिती खूप चांगली असल्याने साहित्याच्या क्षेत्रातही ६०च्या दशकानंतर या भाषेतून साहित्य निर्माण झाले.

आकलनशक्ती ही भाषा ठरवते यामुळे प्रत्येक भाषेला मानवी जीवनात खूप महत्त्वाचे स्थान आहे.आणि त्यातही मानसिकता, त्याचा विस्तार हा केवळ पुस्तकातून साहित्यातून येतो यामुळे ही समाजविकासाची पद्धत ठरते. यामुळे कोणताही समाज हा भाषेने तयार होतो. मातृभाषा हरवली की, तुम्हीही हरवल्यासारखे होता. यामुळेच ‘उचल्या’कार लक्ष्मण गायकवाडांनी लिहिलेल्या पुस्तकांमधील भाषा ही त्यांची आणि मराठीची भाषा होती. म्हणूनच मीही जे काही लिहितो तो अनुभवाने लिहितो आणि तीच माझी भाषा असते. त्यामुळे मी तीला शरण जातो, जे शब्द येतात ती मराठी भाषा बनत असल्याचेही नेमाडे यांनी सांगितले. दरम्यान मराठी भाषेत टाकण्यात आलेले लृ,अं., अः, आदी शब्द कोठून आले हे अजून आपल्याला कळले नाही मात्र असे शब्द काढून टाकले तरी फारसे बिघडत नाही, त्यातही व्याकरणावर एखादा शब्द -हस्व, दीर्घ झाला तरी फार बिघडत नाही, यामुळे ई आणि इ असे अनेक शब्द एकच ठेवले तर पुस्तकांचे आझे कमी होईल असेही प्रतिपादन नेमाडे यांनी केले.

साहित्याचा वापर हा समाजासाठी होत असतोच मात्र त्याचा वापर कसा व किती करावा  हे त्या समाजमनावरच अवलंबून असते. लेखकाने काहीतरी नैतिक भूमिका घेतली पाहिजे आणि सत्याशी प्रामाणिक राहिलं पाहिजे ही प्रत्येक लेखकांने बाळगले पाहिजे.साहित्यकाची खरी ओळख ही त्याने घेतलेल्या भूमिकेवरुन ठरत असते.जे जे चांगले त्याचे अनुकरुन करता येईल पण त्याची मर्यादा मात्र आखता आली पाहिजे असेही  त्यांनी सांगितले. ज्या संस्कृतीत सत्याला पवित्र मानतात अशी वाङमयीन संस्कृती आपोआप पुढे जाते किंवा 'सत्याचा एखादा अंशसुद्धा महत्त्वाचा असतो तसा तो समाजापुढे आणणं हे फार जिकीरीचं, कष्टाचं काम असतं. त्यासाठी फार मोठी किंमत द्यावी लागते, असा मौलिक आदर्शवादी विचार त्यांनी उपस्थितांसमोर मांडला.
मुंबई विद्यापीठाच्या राजीव गांधी समकालीन अध्ययन केंद्राने कलिना संकुलातील फिरोजशहा मेहता सभागृहात आयोजित केलेल्या ‘समकालीन साहित्य आणि समाज’ या विषयावर ते बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख,  अध्ययन केंद्राचे प्रमुख चंद्रकांत पुरी, संस्कृत विभागाच्या प्रमुख गौरी माहुलीकर, मराठी विभागाच्या डॉ. भारती निरगुडकर आणि प्राध्यापक व विद्यार्थी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)